# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः31.10.2024** **वारःगुरुवार**

---

1. विधानसभा निवडणुकीसाठी छाननीअखेर सात हजार पन्नास उमेदवारी अर्ज वैध
2. डेंग्यू या विषाणुजन्य आजारावरील लस भारतात तयार करणार, लसीच्या अंतिम टप्प्यातील चाचण्या आणि उत्पादन पुण्यात होणार
3. शेतात जागेवर फळबाग नसताना बनावट फळपीक विमा उतरविल्याचं राज्यातल्या बहुतांश जिल्ह्यात उघड
4. परदेशातील नातेवाईकांना पुणेकरांनी पाठवला 15 हजार 300 किलोपेक्षा जास्त फराळ, टपाल विभागाला विक्रमी 1 कोटींपेक्षा जास्त उत्पन्न आणि
5. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात वीजा आणि जोराच्या वाऱ्यांसह पावसाचा इशारा

**<u>छाननी</u>**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी 29 तारखेपर्यंत 288 मतदारसंघांसाठी 7 हजार 995 उमेदवारांचे अर्ज दाखल झाले होते. यापैकी 287 मतदारसंघातील 7 हजार पन्नास उमेदवारांचे अर्ज काल छाननीअखेर वैध ठरले आहेत. 917 उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले आहेत. नागपूर पश्चिम विधानसभा मतदारसंघातील एका उमेदवाराच्या अर्जाची छाननी आज होणार आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. 4 नोव्हेंबर अर्ज मागं घेण्याची शेवटची तारीख आहे.

**<u>मालमत्ता जप्त</u>**

विधानसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून 15 ते 30 ऑक्टोबरपर्यंत एकंदर 187 कोटी 88 लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. राज्य आणि केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदेशीर पैसे, दारू, अमली पदार्थ, मौल्यवान धातू इत्यादींचा प्रामुख्यानं समावेश असल्याची माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. राज्य पोलीस विभागानं सुमारे 75 कोटी रूपये, प्राप्तिकर विभागानं सुमारे 60 कोटी रूपये, तर राज्य उत्पादन शुल्क विभागानं जप्त केलेल्या, सुमारे 11 कोटी रूपयांचा यामध्ये समावेश आहे. मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या 'सी-व्हिजील' ॲपवर तक्रार करता येते. या तक्रारींची माहिती सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिली जात असल्यानं आवश्यक ठिकाणी जप्तीची कारवाई केली जात आहे.

**<u>रोकड-पालघर-नाशिक-नवीमुंबई</u>**

पालघर जिल्ह्यालगत दादरा नगर हवेली मधून महाराष्ट्रात येणाऱ्या एका गाडीमधून पोलिसांनी काल चार कोटी 25 लाख रुपये तलासरीमधल्या उधवा तपासणी नाक्यावर तपासणी दरम्यान जप्त केले. नाशिक जिल्ह्यात सातपूर पोलिस ठाणे हद्दीतील पिंपळगाव बहुला नाक्यावर एका मोटारीतून 20 लाख 50 हजारांची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली. तसंच उपनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत बिगारी काम करणाऱ्या एका मजुराच्या घरातून 11 लाख रुपये जप्त करण्यात

आले. नवी मुंबईतल्या सीवूडस परिसरात काल एका चार चाकी वाहनातून 86 लाख 50 हजार रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली.

**<u>सदिच्छादूत नियुक्ती</u>**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशानं मतदारांना आवाहन करण्यासाठी पुण्यातील पर्वती विधानसभा मतदार संघाअंतर्गत सदिच्छादूत म्हणून कवी संदिप खरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर दिव्यांग मतदारांना मताधिकार बजावण्यासाठी प्रोत्साहित करण्याकरीता दृष्टिहीन कलाकार प्रवीण पाखरे यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती मतदारसंघाचे निर्णय अधिकारी मनोजकुमार खैरनार यांनी दिली आहे. सदिच्छादूत म्हणून आपले विचार संदिप खरे यांनी आकाशवाणी प्रतिनिधी नीतीन जळूकर याच्याकडं व्यक्त केले...

**<u>आरबीआय</u>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं इंग्लंडमध्ये ठेवलेल्या सोन्यापैकी 102 टन सोनं धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर देशात परत आणलं आहे. यापूर्वी मे महिन्यात आरबीआयनं 100 टन सोनं परत आणलं होतं. व्यवस्थापनाच्या अहवालानुसार यावर्षी सप्टेंबरपर्यंत भारतीय रिझर्व्ह बँकेकडं 855 टन सोनं होतं. यापैकी 510 टन सोनं भारतात असून उर्वरित परदेशात ठेवलं होतं. सध्याचा वाढता आंतरराष्ट्रीय तणाव आणि आर्थिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर भारताच्या सोन्याच्या साठ्यातील काही भाग देशात आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जगात बँक ऑफ इंग्लंड सोने साठा ठेवण्याचं सुरक्षित ठिकाण म्हणून ओळखली जाते. ही बँक 1697 पासून जगभरातील सोने साठा ठेवत आहे.

**<u>डेंग्यूची लस</u>**

डेंग्यू या विषाणुजन्य आजारावरील लस भारतात तयार करण्यात येत असून लसीच्या अंतिम टप्प्यातील चाचण्या पुण्यात घेतल्या जाणार आहेत. पुण्यातील राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सलेशनल व्हायरोलॉजी अँड एड्स रिसर्च या दोन्ही संस्था यासाठी पुढाकार घेणार आहेत. कोरोनाच्या विषाणूप्रमाणं डेंग्यूच्या विषाणूमध्येही झपाट्यानं उत्परिवर्तन होत आहे. परिणामी हा विषाणू अधिक प्रभावी होत असल्यानं डेंग्यूच्या आजाराची तीव्रता आणि रुग्णांची संख्याही वाढताना दिसत आहे. डेंग्यूच्या चारही उप-प्रकारांवर प्रभावी ठरेल, अशी लस विकसित झाल्यास लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांना दिलासा मिळू शकणार आहे. पुण्यात चिकित्सालयीन चाचण्या तसंच लसीचं उत्पादनही होणार असल्याची माहिती सावर्जनिक आरोग्य विभागाकडून देण्यात आली.

**<u>बनावट फळ विमा</u>**

शेतात जागेवर फळबाग नसताना बनावट फळपीक विमा उतरविल्याचं राज्यातल्या बहुतांश जिल्ह्यात उघड झालं आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यात फळबाग विमा तपासणीचे आदेश पुणे कृषी आयुक्तालयानं दिले आहेत. फळबागांच्या क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रावर पीक विमा भरल्याच्या तक्रारी येत असल्यानं कृषी आयुक्तालयानं विविध जिल्ह्यात पथकं नेमून तपासण्या करण्याच्या सूचना क्षेत्रिय स्तरावर दिल्या आहेत. त्यामध्ये पुणे, सांगली, सोलापूर, जालना, बीड, छत्रपती संभाजीनगर, अहमदनगरसह अन्य जिल्ह्यांचा समावेश आहे. कृषी आयुक्तालयाच्या तपासणी पथकांनी केलेल्या 363 फळबागांच्या तपासण्यांमध्ये 137 ठिकाणी फळबाग लागवड आढळली नाही. तर 55 ठिकाणी लागवडीपेक्षा अधिक क्षेत्रावर फळपीक विमा उतरविला आहे. 18 ठिकाणी उत्पादनक्षम बाग नसतानाही विमा उतरविण्यात आला आहे. बनावट पीक विमा उतरविणं हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे. त्यामुळं बनावट पीक विमा उतरविल्याचं स्पष्ट झालं आहे, अशा शेतकऱ्यांनी आपापले पीक विम्याचे अर्ज तत्काळ मागं घ्यावेत असं आवाहन पुणे कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक विनयकुमार आवटे यांनी केलं आहे.

**टपाल फराळ**

परदेशातील नातेवाईकांना दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेता यावा यासाठी पुणे टपाल विभागानं फराळाचे पदार्थ वेष्टित करून माफक दरात परदेशात पाठविण्याची सोय केली आहे. या उपक्रमाला पुणेकर नागरिकांचा भरघोस प्रतिसाद लाभला असून, आत्तापर्यंत 15 हजार 300 किलो दिवाळी फराळ पुणे टपाल विभागाच्या शहरातील विविध कार्यालयामार्फत परदेशात पाठविण्यात आला आहे. यातून पुणे टपाल विभागाला विक्रमी 1 कोटी रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळालं अशी माहिती पुणे टपाल क्षेत्राचे पोस्टमास्टर जनरल रामचंद्र जायभाये यांनी दिली.

**त्र्यंबक-नाशिक**

बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेल्या नाशिकच्या भगवान त्र्यंबकराजाची ऑनलाइन दर्शन सेवा 2 नोव्हेंबरला दिवाळी पाडव्यापासून सुरू होत आहे. रोज दिवसभरासाठी 4 हजार भाविकांना लाभ घेता येणार आहे. यात 2 हजार भाविक हे कुठल्याही ठिकाणाहून दूरध्वनीद्वारे नोंदणी करू शकतात आणि 2 हजार भाविक प्रत्यक्ष श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर शहरातून नोंदणी करू शकतात.

**आयुक्त भेट-नवी मुंबई**

नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे यांनी काल, दिव्यांग शिक्षण-प्रशिक्षण आणि सेवासुविधा केंद्राला दिवाळीनिमित्त भेट दिली. यावेळी त्यांनी दिव्यांग विद्यार्थी आणि व्यक्तींना फराळ देत, दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसंच उपस्थितांशी संवाद साधला. दिव्यांगांना मदतीचा हात देत, सक्षम करण्याची जबाबदारी ही प्रशासन, विशेष शिक्षक आणि पालक अशी सर्वांचीच असल्याचं शिंदे यावेळी म्हणाले. केंद्रात मुलांसमवेत येणा-या पालकांसाठीही विशेष उपक्रम राबवण्याची सूचना यावेळी आयुक्तांनी केली.

**जिल्हाधिकारी भेट-सिंधुदुर्ग**

संस्थेकडे परत चला या उपक्रमाच्या अंतर्गत सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी अनिल पाटील यांनी बालसुधार गृहातल्या मुलांसोबत काल दिवाळी साजरी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी बालकांसोबत फराळाचा आस्वाद घेतला, या मुलांच्या चेहऱ्यावरचं हसू पाहून दिवाळी खऱ्या अर्थानं साजरी झाल्याची भावना पाटील यांनी व्यक्त केली.

**हवामान**

नरक चतुर्दशीच्या पूर्वसंध्येला, काल रत्नागिरी शहर आणि तालुक्यातल्या अनेक ठिकाणी पावसानं विजांसह हजेरी लावली. दिवाळीला पूर्वी असायची तशी थंडी सध्या नाही; मात्र आताच्या पावसामुळं आलेल्या गारव्यानं दिवसाचं ऊन्हं आणि ढगाळ वातावरण यांमुळं होत असलेल्या उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला. यंदा दीर्घ काळ लांबलेल्या परतीच्या पावसानं गेल्या आठवड्यात विश्रांती घेतल्यामुळं भातकापणीच्या कामांनी वेग घेतला आहे; मात्र पुन्हा पावसानं हजेरी लावल्यानं शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि विजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**